<u>नि.दि.दावा क्र.१७१/२०१५ मधील नि.१११ वरील आदेश</u>

श्री. चंद्रकांत बाबुराव पाटील व १ ... वादी

वि.

श्री. आसिफ इकबाल धनानी व ४ ... प्रतिवादी

........

सदरचा अर्ज हा प्रतिवादीच्यावतीने अतिरिक्त लेखी कैफियत देण्यासाठी झालेला विलंब माफ करण्याकरीता सादर केलेला आहे.

२. सदरच्या अर्जाला वादीच्यावतीने नि.११७ वर म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे.

३. सदरचा अर्ज हा दिनांक १७/०८/२०१६ रोजी व १८/०८/२०१६ रोजी प्रतिवादीचे वकील श्री. ए. पी. अधिकारी हे गैरहजर असल्यामुळे युक्तीवादाकरीता तहकुब करण्यात आला होता. आज देखील प्रतिवादीचे वकील श्री. ए. पी. अधिकारी हे दोन्ही सत्रामध्ये युक्तीवादाकामी हजर झालेले नाहीत. सबब ४.१५ वाजता सदरच्या अर्जावर आदेश पारित करण्यास सुरुवात करण्यात आली.

४. वादी हजर. प्रतिवादी गैरहजर. वादीच्या वतीने वकील श्री. आर. आर. पाल हजर असून त्यांचा युक्तीवाद असा की, प्रतिवादी यांनी सदर अर्जामध्ये विलंब माफीकरीता कोणताही पुरावा दिलेला नाही. त्यांचे पुढे असे कथन आहे की, विलंब ४७ दिवसांचा नसून १५८ दिवसांचा विलंब आहे. सदर बाब वादीने चुकीची नमुद केली असल्याचे त्यांनी निर्दशनास आणले. सदरचा दावा पुराव्याच्या आधारे निकाली निघावा व प्रतिवादीला त्याचा खटला मांडण्याची समान संधी मिळावी म्हणून प्रतिवादीला अतिरिक्त लेखी कैफियतीसाठी झालेला विलंब माफ करणे आवश्यक आहे. परंतु सदरचा झालेला विलंब हा प्रतिवादीच्या निष्काळजीपणामुळे होत असल्याचे अभिलेखावरुन स्पष्ट होते. सबब सदर विलंब माफ करताना प्रतिवादीवर समप्रमाणामध्ये खर्च लादणे आवश्यक आहे. वादीचे वकीलांनी प्रतिवादी हा व्यापारी असून त्यांच्यावर

जास्तीत जास्त खर्च लादावा अशी मागणी केली. सबब मी खालील आदेश पारित करतो.

<u>आ दे श</u>

१. अर्ज नि.१११ हा रुपये २,५००/— (रुपये दोन हजार पाचशे मात्र) खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. सदरचा खर्च भरल्यानंतर नि.११५ वरील अर्ज हा युक्तीवादासाठी निश्चित करावा. जर पुढील तारखेपर्यंत खर्च न भरल्यास सदरचा आदेश रद्द झाला असे समजण्यात येईल.

३. सदरचे लघुलेखन ४.२० मिनीटांनी पूर्ण झाले त्यावेळी वकील श्री. ए. पी. अधिकारी यांचे सहकारी वकील श्री. जयेश पाटील हे हजर झाले त्यांना सदर आदेशाची माहिती देण्यात आली.

स्वाक्षरी/—
(दि. उ. डोंगरे)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
पालघर.

पालघर
दिनांक : २६/०८/२०१६